जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०४/०६/२०२३
## दि.०३/०६/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ४४२/२०२३,भादविक ३२६,३२७,३२३,१४३,१४७,१४८,१४९,५०४,५०६(२),४२७,१२०(ब),महा. पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | सागर कुटे,वय ३४ वर्षे,रा.हगवणेनगर,कोंढवा-ब्रुद्रुक,हवेली,जि.पुणे |
| **आरोपीत** | सहा इसम व त्यांचे अनोळखी साथीदार ८ ते १० इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०६/२०२३ रोजी १६/३० वा.कोलवडी,ता.हवेली,जि.पुणे येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाचे पाठीमागे गट नं.१,ब चे जवळील रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे सासरे संभाजी गायकवाड,रा.कोलवडी,पुणे यांचेसह त्यांचे कारमधुन लोणीकंद येथुन साईटवर येऊन रोडचे कडेला कार पार्क करून थांबले असताना,यातील नमुद इसमांनी कोलवडी शिवार गट नं.१(ब) मधील प्लॉट (जमिनीचे) कारणावरुन बेकायदेशीर जमाव जमवुन,त्यांचे हातात धारदार शस्त्रे,बांबु,दगड घेऊन येऊन,आजु-बाजुचे परिसरात दहशत निर्माण करुन,फिर्यादी व त्यांचे भाऊ मनोज कुटे यास शिवीगाळ करुन,फिर्यादी यांचे डोक्यात धारदार शस्त्राने मारुन गंभीर दुखापत केली. तसेच भाऊ मनोज यास शिवीगाळ व मारहाण करुन,फिर्यादी यांचे कारवर दगडाने मारुन,तीचे नुकसान करुन कार मधील ०२ लाख रुपये घेऊन जावुन,जाताना परत या जागेत आलाच तर जीवे मारुन टाकीन अशी फिर्यादीस धमकी देवुन,त्यांचे हातातील धारदार शस्त्रे व बांबु हवेत फिरवुन,सदर परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, रविंद्र गोडसे ८०८२०७७१०० |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३४६/२०२३,भादविक ३९२,३९४,३४१,३४,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | सचिन तळवार,वय-३१,रा.कोल्हापुर |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०६/२०२३ रोजी पहाटे ०४/३० वा. कात्रज बस स्टॉप पासुन पुढे थोडे अंतरावर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पायी चालत जात असताना,त्यांचे पाठीमागुन दुचाकीवरुन आलेल्या तीन अनोळखी इसमांनी फिर्यादीस पत्ता विचारण्याचे बहाण्याने अडवुन,त्यांचेकडुन ४,५००/- रुपये जबरी चोरी करून काढुन घेतले. फिर्यादी यांनी त्यास विरोंध केला असता,त्यांनी फिर्यादी यांचे डोक्यात कोयता मारुन,त्यांना गंभीर जखमी केले आहे. (सदरचा गुन्हा हा ०० ने शाहुपुरी पो स्टे येथे दाखल होवुन वर्ग करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, रसाळ ९७०२९७४०४० |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणी काळभोर पो स्टे ३५६/२०२३,भादविक ३२४,४२७,३२३,५०४,५०६,महा.पो.का.क.३७(१)१३५,क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | आदित्य भोसले,वय-२०,रा.पठारे वस्ती,लोणी-काळभोर,पुणे |
| **आरोपीत** | एक चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०६/२०२३ रोजी १८/०० वा.मौजे-कदमवाक वस्ती हद्दीत एमएच/१२ या कटींग सलुन दुकानात लोणी स्टेशन,पुणे येथे |

**तपशिल** यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र समीर इद्रीश याचेसह एमएच/१२ या कटींग सलुन दुकानात असताना, यातील नमुद इसमांनी काहीएक कारण नसताना,फिर्यादी यांचे हेअर कटींगचे दुकानात येवुन,फिर्यादी व समीर इद्रीश स्टील यास पाईपाने शिवीगाळ व मारहाण करुन,दुकानातील काच फोडुन नुकसान करुन स्टीलचे रॉड हवेत फिरवुन,सदर परिसरात दहशत निर्माण करून,त्यांचेकडील कार मधुन निघुन गेले आहेत.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. गोरे ९६२३६४११००

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** लोणीकंद पो स्टे ४४०/२०२३,भादविक ३९४,३४१,३२३,५०४,३४

**फिर्यादी** रियाज मुलाणी,वय ४१ वर्षे,रा.वाडे-बोल्हाई,वाडेगाव,पुणे

**आरोपीत** मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ०३/०६/२०२३ रोजी सकाळी ०६/१५ वा.चे सुमारास इंद्रायणी नदीवरील पुलाचे जवळ तुळापुर रस्त्यावर

**तपशिल** यातील फिर्यादी हे इंद्रायणी नदीवरील पुलाचे रोडवरून फिर्यादी व त्यांचे साथीदार राजेंद्र जाधव याचेसह टेम्पो चाकण येथे घेवुन जात असताना,यातील नमुद तीन अनोळखी इसमांनी आपसात संगनमत करून, फिर्यादी यांचे टेम्पोला दुचाकी आडवी लावुन,फिर्यादी यांना हाताने मारहाण करून,त्यांचे डाव्या हाताचे दंडावर कोयत्याने वार करून,जखमी करून,फिर्यादी यांचे खिशातील २,५०,०००/- रूपये रोख रक्कम व मोबाईल फोन असा एकुण २,५८,०००/- रूपये किमतीचा ऐवज जबरी चोरी करून नेला आहे.

**त.अंमलदार** सहा.पोलीस निरीक्षक, रविंद्र गोडसे ८०८२०७७१००

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे ५७१/२०२३,भादविक ३८०

**फिर्यादी** एक ज्येष्ठ नागरीक,वय-६६ वर्षे,रा.कोंढवा-बुद्रुक,पुणे

**आरोपीत** फिर्यादी यांची नातेवाईक एक महिला (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०३/०६/२०२३ रोजी सकाळी १०/३० वा.सर्वे नं.६४,साळवे फार्म,कोंढवा-बुद्रुक,पुणे येथुन

**तपशिल** यातील फिर्यादी यांची नातेवाईक महिला हिने फिर्यादी यांची नजर चुकवुन,फिर्यादी यांचे राहते घरातील बेडरुमच्या लॉकर मधील १५,००,०००/- रुपये रोख रक्कम व १४,२६,०००/- रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने असा एकुण २९,२६,०००/- रुपये किंचा ऐवज चोरी करून नेला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. स्वप्नील पाटील ९९७५६३३७०३

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** शिवाजीनगर पो स्टे ११२/२०२३,भादविक ३९३,३२३,३४

**फिर्यादी** एक नागरीक,वय-३४ वर्षे,रा.अशोकनगर,येरवडा,पुणे

**आरोपीत** मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०३/०६/२०२३ रोजी सकाळी ०८/३० वा.मनपा बस स्टॅण्ड येथील लोहगाव बस स्टॉप जवळ शिवाजी नगर,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांना नमुद ठिकाणी काहीतरी व्यवसाय चालु असल्याचे समजल्याने,फिर्यादी हे सदर ठिकाणी जावुन त्यांचे मोबाईल मधुन व्हिडीओ शुटींग काढण्यासाठी,कॅमेरामेन यांचेसह शुटींग करण्यास सुरुवात केली असताना,यातील नमुद इसमांनी संगनमत करून,फिर्यादी व कॅमेरामेन यांचे डाव्या हातावर फटका मारून,त्यांचेकडुन मोबाईल हिसकावुन घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. पी.बी.साळवे ९५५२५७०७११

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**